**महाराष्ट्र शासन**

नगर विकास विभाग, मंत्रालय, ४ था मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
nirmal.chaudhari@gov.in

क्रमांक :- टिपीबी - ४३१९/प्र.क्र.१५६/२०१९/नवि-११ दिनांक :- ०३/०५/२०२३

प्रति,
आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका.

विषय :- Request For Extension To Installment Facility In Premium Payable To State Government.

संदर्भ :- १) शासन नगर विकास विभागाचे पत्र क्र. टिपीबी-४३१९/प्र.क्र.१५६/२०१९/नवि-११, दि. १९/०९/२०१९.
२)मे. PEATA चे दि. १०/०५/२०२२ रोजीचे पत्र.
३) मे.क्रेडाई-एमसीएचआय यांचे दि.२१/०४/२०२२ रोजीचे पत्र.
४) प्रमुख अभियंता ( वि.नि.), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र.ChE/DP/९१५२/Gen., दि. २/०५/२०२३

महोदय,

शासन नगर विकास विभागाकडील संदर्भ क्र. १ वरील पत्राद्वारे बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ चे विनियम ३०, विनियम ३३, विनियम ३१(३) तसेच नियमावलीत जेथे शासनास तसेच ठराविक तरतुदींतर्गत धारावी पुनर्विकास प्रकल्प, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, म्हाडा यांना अधिमूल्य देय ठरते, त्यांनी देय अधिमूल्य बृहन्मुंबई महानगरपालिकेचे धर्तीवर, हप्त्याने व्याजासकट भरणा करुन घेणेस, महापालिकेच्या परिपत्रकात नमूद इतर तरतुदी व अटी सापेक्ष दि. ४/०९/२०१९ पासून २ वर्षांच्या कालावधीकरीता सवलत दिली होती.

आता, संदर्भिय पत्र क्र. २ व ३ अन्वये मे. PEATA व मे. क्रेडाई-एमसीएचआय यांनी सदरचे सवलतीस मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

महापालिकेस प्राप्त झालेले विनंती अर्ज विचारात घेऊन, अधिमूल्य हप्त्याने भरणा करण्याबाबतच्या सवलतीस महापालिकेने, महापालिकेकडील दि. १७/०९/२०१९ रोजीच्या परिपत्रकातील नमूद अटी व तरतुदीस अधिन राहून दि. ३/०९/२०२५ पर्यंत कालावधी वाढविला असल्याचे, महापालिकेने दि. २/०५/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे.

त्यानुसार, बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ३०, विनियम ३३, विनियम ३१(३) तसेच नियमावलीत जेथे शासनास तसेच ठराविक तरतुदींतर्गत धारावी पुनर्विकास प्रकल्प, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, म्हाडा यांना अधिमूल्य देय ठरते, त्यांनी देय अधिमूल्य बृहन्मुंबई महानगरपालिकेचे धर्तीवर, हप्त्याने व्याजासकट

भरणा करुन घेणेस, महापालिकेच्या परिपत्रकात नमूद इतर तरतुदी व अटी सापेक्ष दि.३/०९/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदरची मुदतवाढ शासनाच्या दि. १९/०९/२०१९ रोजीच्या पत्रात नमूद केलेली मुदतवाढ संपल्यापासून, म्हणजेच दि. ४/०९/२०२१ पासून लागू राहील.

**(अ) ७० मीटर पर्यंतची प्रस्तावित उंची असलेल्या इमारतीसाठी देय अधिमूल्याचे हप्ते.**

| **Initial payment** | **At the end of Month with interest** | | | |
|---|---|---|---|---|
| | 12th | 24th | 36th | 48th |
| 1st Installment | 2nd Installment | 3rd Installment | 4th Installment | 5th Installment |
| 10% | 22.5% | 22.5% | 22.5% | 22.5% |

**(ब) ७० मी. किंवा त्यापेक्षा जास्त उंची प्रस्तावित असलेल्या इमारतीसाठी देय अधिमूल्याचे हप्ते.**

| **Initial payment** | **At the end of Month with interest** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 12th | 24th | 36th | 48th | 60th |
| 1st Installment | 2nd Installment | 3rd Installment | 4th Installment | 5th Installment | 6th Installment |
| 10% | 18% | 18% | 18% | 18% | 18% |

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणेच शासनास व अधिपत्याखालील मंडळे/ प्राधिकरणे यांना देय अधिमूल्याची वरीलप्रमाणे हप्त्याने व्याजासकट वसुली केली जावी. यामध्ये उल्लंघन झाल्यास महानगरपालिकेचे परीपत्रकानुसार कारवाई करण्यात यावी.

वरीलप्रमाणे सवलत ही शासन तसेच धारावी पुनर्विकास प्रकल्प, म्हाडा, महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना देय अधिमूल्यास देखील लागू राहील आणि त्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेने संनियंत्रण ठेवाव असे आपणांस कळविणेचे मला आदेश आहेत.

**आपला,**

**(अमर पाटील)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :-
१) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प.
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ.
५) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई